आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२३ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पोलंडचा दौरा आटोपून प्रधानमंत्री युक्रेनमधे कीव्ह इथं पोहोचले
- प्रधानमंत्री येत्या रविवारी महाराष्ट्रात जळगाव इथं लखपती दीदींशी साधणार संवाद
- पृथ्वी-दोन या आण्विक क्षमतेच्या बॅलिस्टीक क्षेपणास्त्राची आणखी एक चाचणी यशस्वी
- अमेरिकेत उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाची निवणूक लढवण्याचा प्रस्ताव औपचारिकरीत्या स्वीकारला

  **आणि**
- भारताच्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघांच्या इंग्लंड दौऱ्याचा कार्यक्रम जाहीर

**<><><><><>**

पोलंडचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज युक्रेनची राजधानी कीव्ह इथं पोहोचले. कीव्हमधल्या भारतीय समुदायानं त्यांचं उत्साहात स्वागत केलं. मोदी आज युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत.

झेलेन्स्की यांच्याशी  परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी झालेल्या चर्चेला अंतिम रूप देण्यासाठी उत्सुक असून युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष शांततापूर्वक मार्गानं सोडवण्याच्या मुद्द्यावरही चर्चा करणार असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी युक्रेनला रवाना होण्यापूर्वी  सांगितलं. युक्रेनमध्ये लवकरच शांतता आणि स्थिरता येईल, असा विश्वासही मोदी यांनी व्यक्त केला.

युक्रेनशी १९९२ मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच युक्रेन दौरा आहे. मोदी यांच्या या ऐतिहासिक दौऱ्यामुळे उभय देशांतले संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या युक्रेन भेटीमुळे रशिया युक्रेन संघर्ष संपण्यास मदत होईल, अशी आशा संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांनी व्यक्त केली आहे. त्यांचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक यांनी म्हटलं आहे. अनेक देशांच्या प्रमुखांच्या भेटींसह सर्वसाधारण सभेचे ठराव, आंतरराष्ट्रीय कायदा आणि प्रादेशिक एकात्मतेसाठीचे प्रयत्न यामुळे हा संघर्ष थांबवण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. रशियानं लष्करी कारवाई थांबवावी अशी मागणी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनं किमान तीन ठरावांमध्ये केली आहे, तर एका ठरावात युक्रेनच्या पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले थांबवण्याची मागणी केली आहे, असंही दुजारिक यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी महाराष्ट्रात जळगाव इथं येणार आहेत. त्यावेळी ११ लाख लखपती दीदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत. वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न कमावणाऱ्या लखपती दीदींबरोबर ते यावेळी  संवाद साधतील. राज्यातल्या स्वयंसहाय्यता गटांसाठी अडीच हजार कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. तसंच पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज जारी करतील. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४ राज्यांमधल्या जवळजवळ ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात

लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी होणार आहेत. आतापर्यंत एक कोटी लखपती दीदी झाल्या सून येत्या ३ वर्षात ही संख्या ३ कोटीवर जाईल अशी माहिती ग्रामविकासमंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह अमेरिकेच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. संरक्षण मंत्र्यांच्या या भेटीत भारत आणि अमेरिकेत पुरवठा सुरक्षा व्यवस्था करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. या करारातून परस्परांना संरक्षण सामग्री पुरवठ्यात प्राधान्य देण्याचं मान्य झालं.

अमेरिकेबरोबर असा करार करणारा भारत हा अठरावा देश आहे. दोन्ही देशांमध्ये संपर्क अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतही सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. सध्या आणि भावी काळातल्या संरक्षण विषयक सहयोगासंदर्भात राजनाथ सिंह अमेरिकन संरक्षण उद्योगाबरोबर उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत

राजनाथ सिंग यांनी वॉशिंग्टनमधल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधला.

**<><><><><>**

भारताने काल पृथ्वी-दोन या आण्विक क्षमतेच्या बॅलिस्टीक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. रात्री ओदिशातल्या समुद्रकिनाऱ्यावर ही चाचणी झाली. डीआरडीओ म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने विकसित केलेलं हे क्षेपणास्त्र ५०० ते एक हजार किलोग्रॅम वजनाचा शस्त्रभार घेऊन जाऊ शकते. पृष्ठभागावरुन साडेतीनशे किलोमीटर पर्यंत मारा करु शकणाऱ्या पृथ्वी-दोन ला दोन

इंजिनं लावली आहेत. या चाचणीच्या वेळी डीआरडीओचे अधिकारी तसंच वैज्ञानिक उपस्थित होते.

**<><><><><>**

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन आज साजरा होत आहे. भारतीय चांद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर गेल्या वर्षी याच दिवशी उतरलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने अंतराळ क्षेत्रातल्या प्रगतीमधे दिलेल्या योगदानाचा गौरव केला. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते इस्त्रोच्या रोबोटिक चॅलेंज आणि भारतीय अंतरिक्ष हॅकेथॉनच्या विजेत्यांना परितोषिके प्रदान करण्यात आली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी समाजमाध्यमातल्या संदेशातून भारतीयांना पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेत उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाची निवणूक लढवण्याचा प्रस्ताव औपचारिकरीत्या स्वीकारला आहे. शिकागो इथं डेमोक्रॅटिक पक्षाच्या मेळाव्यात काल त्यांनी ही घोषणा केली. अमेरिकनांना एकत्र आणणंआणि अमेरिकेच्या भविष्यासाठी लढणं हेच आपलं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनी अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेताना डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार म्हणून भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांचं नाव जाहीर केलं होतं. हॅरिस निवडणुकीत यशस्वी झाल्यास त्या अमेरिकेच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरतील.

**<><><><><>**

अमेरिकेने सुधारित Messenger RNA प्रकारच्या कोविड लशीच्या वापराला परवानगी दिली आहे. सध्या आढळत असलेल्या कोविड उपप्रकाराच्या प्रतिकारासाठी ही लस अधिक सक्षम आहे. अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाने आपत्कालीन परिस्थितीत १२ वर्षे वयापेक्षा अधिक वय असणाऱ्यासाठी या लशीच्या तात्काळ वापरासाठी परवानगी दिली आहे. मॉडर्ना आणि फायझर बायो एन टेक या लशींचा वापरही ६ महिने ते ११ वर्षे वय असणाऱ्यांवर करता येईल असं अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

नवे केंद्रीय गृह सचिव म्हणून ज्येष्ठ आयएएस अधिकारी गोविंद मोहन यांनी आज कार्यभार हाती घेतला. यापूर्वी अजयकुमार भल्ला यांच्याकडे हा कार्यभार होता. काल ते निवृत्त झाल्याने ही जबाबदारी १९८९ च्या तुकडीचे गोविंद मोहन यांच्यावर सोपवण्यात आली आहे. गोविंद मोहन याअगोदर सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव होते.

**<><><><><>**

यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘एक पेड मां के नाम’ ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत देशभरात वृक्षारोपण मोहिमेत लोक उत्साहाने सहभागी होत आहेत. नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन परिसरात आज आकाशवाणीच्या महासंचालक मौसमी चक्रवर्ती आणि

अतिरिक्त महासंचालक एल. मधु नाग यांनी वृक्षारोपण केलं. या मोहिमेत आकाशवाणीच्या अन्य अधिकाऱ्यांनाही सहभाग घेतला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग असेल.

**<><><><><>**

भारताच्या पुरुष क्रिकेट संघाच्या इंग्लंड दौऱ्याचा कार्यक्रम काल जाहीर करण्यात आला. रोहित शर्मा याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पुढच्यावर्षी जूनमध्ये इंग्लंडमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. हे सामने लीड्स, बर्मिंहम,लंडन, आणि मॅनचेस्टर इथं खेळले जाणार आहेत.

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कार्यक्रमाचीही घोषणा झाली आहे. हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघ पुढच्या वर्षी म्हणजे जून आणि जुलै २०२५ मध्ये इंग्लंडमध्ये पाच टी-ट्वेंटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे.

**//<><><><><>//**